# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

निवडणूक महत्वाचे

जा.क्र.रासनिप्रा/परिपत्रक/ ४३१५/२०१५
दिनांक: ३०/०४/२०१५
६/५/२०१५

## परिपत्रक

**वाचावे:-** १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ अ अ अ(५)
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६४
३. या प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. रासनिप्रा/ संस्था समिती गठण/परिपत्रक/८८१/१५ दि. २३/१/२०१५

**विषय :- ज्या संस्थांच्या निवडणूक प्रकीयेत २/३ पेक्षा कमी सदस्य निवडून आले आहेत अशा समिती सदस्यांचे गठण करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने वाचावे क्र. ३ च्या परिपत्रकाव्दारे मार्गदर्शन केलेले असताना सुध्दा ज्या संस्थांचे निवडणूक प्रक्रीयेत २/३ पेक्षा कमी समिती सदस्य निवडून आलेले आहेत, अशा समिती सदस्यांचे गठन करावे किंवा कसे? या बाबत प्राधिकरणास मार्गदर्शन करणेबाबत विनंती अर्ज प्राप्त होत आहेत.

त्या अनुषंगाने या संदर्भात वाचावे क्र ३ चे परिपत्रका शिवाय पुढील प्रमाणे कारवाई करणे बाबत निर्देशित करण्यात येत आहे.

१. २/३ पेक्षा कमी सदस्य निवडून आलेले असल्यामूळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ अ अ अ (५) अन्वये समितीची रचना निबंधकास करता येणार नाही.
२. संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीनूसार निबंधकाने निर्णय घ्यावा.
३. २/३ पेक्षा कमी सदस्य निवडून आलेले असल्यामुळे सदर संस्थेची निवडणूक पुन्हा (Denovo) घेण्याची प्रक्रीया करावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशाने.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति :-**
१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालूका /प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)